बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)
चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक १० | बुधवार,दि.१० फेबुवारी २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# स्व.मनोहरभाई पटेल यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य प्रेरणादायी–राज्यपाल भगतसिंह कोश्यारी



**गोंदिया :** साधन सुविधा नसलेल्या काळात स्व. मनोहरभाई पटेल यांनी उदात्त हेतूने केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य आजही प्रेरणादायी व अनुकरणीय असल्याचे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

स्व. मनोहरभाई पटेल यांच्या ११५ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून आयोजित सुवर्ण पदक प्रदान समारोह कार्यक्रमात ते बोलत होते. खासदार प्रफुल्ल पटेल, हरिहरभाई पटेल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आमदार अभिजित वंजारी, विन–ोद अग्रवाल, सहसराम कोरोटे, विजय रहांगडाले, राजू कारेमोरे व नरेंद्र भोंडेकर, माजी खासदार खुशाल बोपचे, मधुकर कुकडे, माजी आमदार अनिल बावणकर, नामदेव उसेंडी, बंडू सावरबांधे, नाना पंचबुद्धे, सुनील फुंडे, नामदेवराव किरसान, रमेश डोंगरे, के.आर.शेंडे, विजय शिवणकर, नगराध्यक्ष अशोक इंगळे या कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थित होते. स्व.मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून राज्यपालांनी अभिवादन केले. त्यांनतर दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गोंदिया शिक्षण संस्था उभी करून

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

या भूमीत शैक्षणिक संस्कार रुजविण्याचे काम मनोहरभाईनी केल्याचे श्री. कोश्यारी म्हणाले. चांगले विचार व संस्कार माणसांना मोठे करतात असे सांगून राज्यपाल म्हणाले की, या संस्थेमधून हे संस्कार रुजविण्याचे काम अव्याहतपणे केले गेले आहे. मनोहरभाईनी लावलेल्या या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. यावेळी राज्यपालांनी मातृशक्तीचा उल्लेख करून महिलांनी प्रत्येक क्षेत्रात प्रगतीचे शिखर गाठले असल्याचे सांगितले. पदक प्राप्त करणाऱ्यांमध्ये मुलींची संख्या जास्त असल्याचा उल्लेख करून ग्रामीण भागातील महिलांनी सुद्धा आपल्या कर्तुत्वाने विविध क्षेत्र पादाक्रांत केली आहे आहेत. मातृशक्तीचा हा जागर शैक्षणिक क्रांतीमुळेच शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

मनोहरभाईचे शैक्षणिक व सामाजिक कार्य सर्वांनी आचरणात आणावे असे सांगून देशाच्या विकासासाठी व प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे राज्यपाल म्हणाले. यावेळी राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

भंडारा–गोंदिया जिल्हा एक असतांना भंडारा येथे केवळ एकच शाळा होती अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मनोहरभाईनी एकाच दिवशी २२ हायस्कूलची उभारणी करून गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केल्याचे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. शिक्षण व समाजकार्याला महत्त्व देत त्यांनी गोंदिया शिक्षण संस्था उभारली व आज गोंदिया भंडारा जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती घडवून आणली आहे. मनोहरभाईनी केवळ शिक्षणच नाही तर सिंचनालाही महत्त्व दिल्याचे त्यांनी सांगितले. मनोहरभाईच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा त्यांनी यावेळी आढावा सादर केला. या कार्यक्रमापूर्वी एनएमडी महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित कृषी उत्प–ादन व हस्तकला प्रदर्शनीला श्री. कोश्यारी यांनी भेट दिली. एन.एम.डी महाविद्यालयातील रसायणशास्र प्रयोगशाळेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते करण्यात आले. विविध परिक्षा व विषयात प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कोविड काळात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉ. सुवर्णा हुबेकर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन माजी आमदार राजेंद्र जैनयांनी केले. विविध क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती, प्राध्यापक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.



### गोंदियात येवून मी स्वयंसेवक धन्य झालो-राज्यपाल

**संघाचा मी स्वंयसेवक आहे. त्यामुळे आम्ही कुठेही आणि कुणाच्याही घरात विनापरवानगी शिरणारे असल्याने येथे येताना तर आनंदच झाला.त्यातच ज्यांच्यामुळे मी संघाचा कार्यकर्ता झालो ते गोंदियाचे विश्वनाथ लिमये यांच्या गोंदियात येण्याची मनातील ईच्छा प्रफुलभाईनी मनोहरभाईच्या जयंती निमित्ताने पुर्ण झाली.**

**समाजाप्रती जेवढे प्रेम मनोहरभाईंनी वाढले की आज त्यांना आम्ही सर्वचजन आठवन करतोय. सर्वाना सोबत घेऊन चालने शिकले पाहिजे.देशाच्या विकासात आजपर्यंतच्या सर्वच प्रधानमंत्री व विविध राजकीय पक्षाचे जे योगदान राहिले त्यापेक्षा कितीतरी अधिक यो–गदान विद्यमान प्रधानमंत्री नरेंद् मोदी यांचे असल्याचे म्हणाले.**







गुजराथी नॅशनल हायस्कूलची आस्था अनिलकुमारबिसेन व निष्ठा राजेशसिंह, तिरोडा तालुक्यातील वडेगाव येथील भिमरामजी विद्यालयाची श्रेया ओमप्रकाश रहांगडाले तसेच आर.जे. लोहिया विद्यालय सौंदडची विद्यार्थीनी ट्विंकल संजयउके, एसएससीमध्ये सर्वाधिक गुण उत्तीर्ण झालेली एमएम पटेल कनिष्ठ विद्यालयाची विद्यार्थीनी आदिती प्रेमकुमार भक्तवती, विवेक रोचवानी, बी.एम.ध्ये. सर्वाधिक गुण उत्तीर्ण झालेलीएस.एस.गर्ल्स महाविद्यालयाची पुष्पा लिल्हारे, बी. कॉम, मध्ये सर्वाधिक गुण प्राप्तकरणारी नमाद महाविद्यालयाची विद्यार्थीनी रिया नोतानी, बी.एस्ससी मध्ये सर्वाधिक गुणउत्तीर्ण झालेली धोटी बंधू विज्ञान महाविद्यालयाची साक्षी प्रसाद, अभियांत्रिकीमध्येसर्वाधिक गुण प्राप्त करणारा मनोहरभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी अनिकेत दिलीप खंडारे, भंडारा जिल्ह्यातील ऋजुजा वाघाये, पूजा मेहता, भाग्यश्री बोरकर,रोशनी पिजानी, प्रदीप बुरडे, श्वेता पडोले आदी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्तेसुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले.

# कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त

**गोंदिया:** मागील ६ महिन्यांपासून गोंदिया जिल्हा परिषदेचा कारभार प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या खांद्यावर आहे. परिणामी प्रशास–नाची कामे दिवसेंदिवस लांबणीवर जात आहेत. मागील २ वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या तीनही तांत्रिक विभागातील कनिष्ठ अभियंताची २४ पदे रिक्त आहेत. तरीही पदोन्नतीची प्रक्रिया लांबणीवर टाकली जात आहे. त्यामुळे या प्रक्रियेत सहभागी असलेल्या त्या अधिकाऱ्यांचा मनसुबा काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेत मागील सहा महिन्यांपासून अधिकारी राज सुरू आहे. ३ महिन्यापूर्वी जिल्हा परिषदेला प्रदिपकुमार डांगे हे सीईओ म्हणून लाभले. त्यांचे तत्पर कार्यप्रणाली असली तरी जिल्हा परिषदेचे काही अधिकारी त्यांच्यापासून महत्वाचे कामे दूर ठेवत आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा, लघू पाटबंधारे विभाग व बांधकाम विभागाचे जवळपास १२ ते १३ अभियांत्रिकी सहाय्यक मागील २ वर्षापासून पदोन्नतीच्या प्रतिक्षेत आहेत. तर दुसरीकडे जिल्हा परिषदेचा बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंताचे एकूण ३२ मंजूर पदांपैकी १४, लघु पाटबंधारे विभागात २४ मंजुर पदांपैकी ६ व ग्रामीण पाणी पुरवठा विभागात २२ मंजूर पदांपैकी ४ कनिष्ठ अभियंताची पदे रिक्त आहेत. असे एकूण जिल्हा परिषदेच्या तिन्ही विभागात कनिष्ठ अभियंता ७८ मंजुर पदांपैकी ५४ पदे भरलेली असून २४ पदे रिक्त आहेत. एका अभियंताच्या खांद्यावर दोन–दोन शाखांचा कारभार देण्यात आला आहे. यामुळे विकासकामांवर थेट परिणाम पडत आहे. असे असले तरी अभियांत्रिकी सहाय्यकांच्या पदोन्नतीची फाईल काही निवडक अधिकाऱ्यांच्या स्वार्थापोटी अडविण्यात आली आहे. त्यामुळे पदोन्नतीची प्रक्रिया लांबणीवर टाकणाऱ्या त्या अधिकाऱ्यांचा मनसुबा काय? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. या गंभीर बाबीकडे जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे हे लक्ष केंद्रीत करून त्या अभियांत्रिकी सहाय्यकांना न्याय देणार काय? याकडे लक्ष ला–गले आहे.

# आमदार वंजारींची ओबीसी संघर्ष समिती कार्यालयाला भेट



**गोंदिया:** नागपूर विभागीय पद–वीधर मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार अभिजित वंजारी आणि गडचिरोलीचे माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी यांनी गोंदिया जिल्हा ओबीसी संघर्ष कृती समितीच्या जिल्हा कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत ओबीसींची स्वतंत्र जनगणना या मुद्यावर तसेच आंदोलनाची दिशा काय राहील यावर चर्चा करण्यात आली. यावेळी ओबीसी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे, कार्याध्यक्ष अमर वराडे, महासचिव शिशिर कटरे, कैलास भेलावे, खेमेंद्र कटरे ओबीसी सेवा संघाचे संजीव रहांगडाले, विद्यार्थी सचिव गौरव बिसेन, चंदू बहेकार, पप्पू पटले बाळकृष्ण कावडे, प्यारेलाल तुरकर, राजेश वाधवानी, एकनाथ हत्तीमारे, प्रेमलाल गायधने व ताकसांडे व इतर मंडळी उपस्थित होते

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची फ्लाइंग क्लबला भेट

**गोंदिया:** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी बिरसी येथील फ्लाइंग क्लबला भेट देवून पाहणी केली. अतिदुर्गम समजल्या जाणा?्या गोंदिया जिल्ह्यात तुम्हाला चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळत आहे. या संधीचे सोने करा. जशी भरारी आकाशात घेता तशी गगनभरारी सामाजाच्या सर्वागिण विकासासाठी अंगिकारुन समाजाचा विकास साधण्यासाठी प्रयत्नशिल रहावे, असे ते म्हणाले. प्रफु?ल पटेल यांच्या पुढाकाराने गोंदिया येथे फ्लांईग क्लब संस्थेची स्थापना करण्यात आली, ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी संस्थेचे संचालक अवतारसिंग यांनी राज्यपाल व श्री. पटेल यांना स्मृतीचिन्ह देवून सत्कार केला. राज्यपालांनी प्रशिक्षणार्थी विमानात बसून पायलट प्रशिक्षणाचे निरिक्षण केले व तांत्रिक बाबी जाणून घेतल्या. खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार राजू कारेमोरे, जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे, जिल्हा पोलीस अधिक्षक विश्व पानसरे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, माजी खासदार मधुकर कुकडे, गोंदियाचे नगराध्यक्ष अशोक इंगळे आदी विमानतळावर उपस्थित होते.

# रेती तस्करी जोमात,अधिकारी कोमात

**गोंदिया:** जिल्ह्यात मागील दोन वर्षापासून रेतीघाटांचे लिलाव झाले नसताना घाटावरुन अवैध रेतीउपसा सुरु असून तस्करांचा धंदा जोमात सुरु आहे. असे असले तरी कारवाईच्या नावावर काही ट्रॅक्टर व टिप्पर चालकांवर कारवाई करुन स्वत:ची पाठ थोपटून घेणारे अधिकारी मात्र कोमात असल्याची परिस्थिती जिल्ह्यात पाहावयास मिळत आहे.



## अवैध रेती वाहतुकीसाठीचे चर्चेनुसार दरपत्रक

| | |
|---|---|
| मंडळ अधिकारी–तलाठी | ५ ते १० हजार |
| नायब तहसीलदार ते तहसीलदार | १० ते १५ हजार |
| एसडीओ | १० ते २५ हजार |
| निवासी उपजिल्हधिकारी व खनिकर्म अधिकारी | २५ ते ४० हजार |
| जिल्हाधिकारी | ५० हजार ते १ लाख |

याच प्रमाणे पोलीस विभागालाही अवैध रेती वाहतुकदाराकडून महिन्याकाठी दर फिक्स करून रेतीचा काळाबाजार केला जात असल्याची चर्चा आहे. रेतीचे व इतर टिप्पर मार्गावरुन धावत असताना महिन्याकाठी ३ ते ५ हजार रुपये टिप्पर पोलीस व आरटीओ विभागाकरिता दयावे लागतात, असे या वाहतुकदारांचे म्हणने आहे.

### कारवाईचे आदेश पण

**एकीकडे वाळूमाफीयांच्या मुसक्या आवळण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी फौजदारी कारवाई करण्याचे आदेश महसूल यंत्रणेला दिले असले तरी जिल्ह्यातील सडक अर्जुनी, मोरगाव–अर्जुनी, तिरोडा आणि जिल्ह्याच्या सीमेवरील सौंदड व भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील परसोडी या घाटावर जिल्हाधिकारी यांचे आदेश पायदळी तुडवीले जात आहे. वरिष्ठांना कारवाई करीत असल्याचे सांगून ट्रॅक्टरवाल्यांवर कारवाई दाखवून वाळूचे टिप्पर महसूल यंत्रणेच्या जाळयातून सहीसलामत बाहेर पडत आहेत. सध्या वाळूमाफीयांनी चुलबंद नदी, वैनगंगा नदी, वाघनदी, येथील घाट वाळूमाफीयांच्या स्वाधीन असल्याचे बोलले जात आहे.**

### बंदी तरीही उपसा

**जिल्ह्यातील वाळूमाफीया या घाटावर कब्जा करुन बसले आहेत. वाळू उपशावर बंदी असताना शासकीय व व्यवसायीक बांधकामावर वाळू येते कुठून याची साधी चौकशी महसूल यंत्रणेमार्फत केली जात नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे जिल्ह्याचे ठिकाणी दररोज रात्रीला १०० टिप्पर वाळू आणली जाते. मात्र खुलेआम वाळूचे मोठमोठे ढिगारे साठ्वून ठेवलेले पाहून सुद्धा त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.**

### माफियांवर नियंत्रण नाही

**वाळूमाफियांवर कोणाचेही नियंत्रण नसून सदर तस्करी लोकप्रतिनिधी व शासकीय पातळीवर मॅनेज असल्याचे सांगितले जाते. वाळू वाहतुक करण्याच्या वेळा ठरलेल्या असून तया वेळेमध्ये त्या मार्गावर संबंधित महसूल विभाग व पोलीस विभाग फिरणार नाही. असा धुपा करार वाळूमाफिया व अधिकाऱ्यामध्ये झाल्याचे खुलेआम बोलले जात आहे. तेव्हा या माफियांवर कुणाचेही नियंत्रण नाही असेच चित्र सध्यातरी जिल्ह्यात पहावयास मिळत आहे.**

विशेष म्हणजे रेती उत्खननाच्या बाबतीत शासनाच्या नियमांनाच तिलांजली देण्यात येत असल्याचे चित्र असून शेजारच्या मध्यप्रदेश राज्यातील रेतीही जिल्ह्यात चोर रस्त्याने दाखल होत आहे. अशात कारवाई न होणे म्हणजे संबंधित विभागाच रेती माफीयांच्या दावनीला असल्याचे म्हणता येईल.

मागील दोन वर्षांपासून जिल्ह्यातील रेतीघाट बंद पडून असताना यंदा काही रेतीघाटांची लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात आली. मात्र ही लिलाव प्रक्रियादेखील थंडबस्त्यात पडून आहे. तेव्हा जिल्ह्यातील सर्व रेतीघाटावर अवैध रेतीउपसा सुरु असून या घाटावर तस्करांनी ताबा घेतला आहे. यात मात्र, संबंधित महसूल व पोलीस विभाग बघ्याची भूमिका घेत आहेत. जिल्ह्यातील रेतीतस्करांनी विशेषत: तीनपट रेतीचे दर वाढविले असून खासगी बांधकाम, शासकीय बांधकाम व व्यावसायीकांना विकत आ–हेत. अधिकृतपणे रेती मिळत नसल्याने आता रेतीमाफियांच गाव तिथे दलाल तयार झाले आहेत. विशेष म्हणजे यापुर्वी रेती ट्रॅक्टरमागे १००० रुपयाला मिळत होती. ती रेती आज ४००० ते ५००० रुपयांना विकली जाते. आणि ८ ते १० हजार रुपयाला विक्री होणारी एक टिप्पट रेती आजघडीला २८ ते ३० हजार रुपयाला विकली जात आहे.

सध्याच्या घडीला जिल्ह्यातील एकही घाट लिलाव झालेला नसून मध्यप्रदेशातील खैरी घाट, बपेरा घाट व मुंडेसरा घाटातून रेतीची वाहतुक गोंदिया जिल्ह्यात केली जात आहे. या घाटातून एक फेरी रेती करिता रॉयल्टी घेवून जिल्ह्यातील नदी घाटातून चोरट्या मार्गाने तीन फेऱ्या रेतीची चोरी मध्यप्रदेशातील एका रॉयल्टीवर रेती माफियांच्या माध्यमातून सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

रेती घाट खरेदी करण्याकरिता खर्च अधिक असल्याने आम्हाला अशा प्रकारे काम केल्याशिवाय रेतीचा व्यवसाय करु शकत नसल्याचे या व्यावसायीकांचे म्हणने आहे. एक ब्रास रेतीकरिता १३८८ रुपये हे शासकीय रॉयल्टीचे दर असल्याचे बोलले जाते. रेती घाट खरेदी केल्यानंतर सुरु करण्यासाठी १ कोटी २० लाख पर्यंतचा खर्च या प्रक्रियेत होत असल्याचे यांचे म्हणने आहे. त्यात २० टक्के सुरक्षा भाडे, २ टक्के अनामत ठेव, २० टक्के इतर खर्च (अधिकारी, कर्मचारी, पोलीस) व मशीन खर्च असा भुर्दंड बसतो. त्यामुळे आम्हाला एका रॉयल्टीवर दोन ते तीन फेऱ्या माराव्या लागतात. असे या रेती व्यवसायीकांचे म्हणने आहे.

# बार्टीच्या राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्तीत अनियमितता

**नागपूर:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) वतीने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती मध्ये (फेलोशीप) प्रचंड अनियमितता असल्याने संशोधक विद्यार्थ्यांना याचा फटका बसत आहे. २०१८ नंतर बार्टी ने थेट जानेवारी २०२१ उजाडल्यानंतर जाहिरात देत अधिछात्रवृत्तीसाठी अर्ज मागवले आहेत. त्यामुळे २०२० आणि २०२१ मध्ये पात्र संशोधक उमेदवारांना पुन्हा किती वर्ष वाट बघावी लागेल, असा प्रश्न विचारला जात आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर १९९३ ला कोलंबियाला उच्च शिक्षणासाठी गेल्याच्या घटनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभुमीवर राज्य सरकारच्या वतीने पूर्णवेळ पीएच.डी. करणाऱ्यांसाठी बाबासाहेबांच्या ना–वाने राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजना २०१३ पासून सुरु करण्यात आली.

बार्टीच्या माध्यमातून ही योजना राबविली जात असून दरवर्षी १०५ विद्यार्थ्यांना याचा लाभ दिला जातो. २०१३ मध्ये योजनेची आखणी करताना दरवर्षी यामध्ये एका जागेची वाढ करण्याचा निर्णयही अद्याप अर्धांतरीच आहे. सात वर्षामध्ये लाभार्थ्यांची संख्या केवळ १०५ करुन १०६ करण्यात आली आहे. यामध्ये दिव्यांगांसाठी ५. महिलांसाठी ३२ तर खुल्या (महिला–पुरुष) ६९ जागांचा समावेश आहे. अनुसूचित जा–तीतील विद्यार्थ्यांचा संशोधनातील टक्का वाढावा, या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या या योजनेला बार्टीच्या अनियमित कारभाराचा फटका बसत आहे. बार्टीने २०१८ मध्ये अधिछात्रवृत्तीसाठी अयर्ज मागविले होते. त्यानंतर दोन वर्षांनी २७ जानेवारी २०२१ ला बार्टी ने नवीन जाहिरात काढून २०१९ वर्षासाठी अर्ज मागविले आहेत. अधिछात्रवृत्तीसाठी दरवर्षी बार्टीकडे शेकडो विद्यार्थी अर्ज करत असून त्यातून केवळ १०५ विद्यार्थ्यांची निवड होते. त्यामुळे मागील दोन वर्षापासून शेकडो विद्यार्थी प्रतीक्षेत असून २०२० आणि २०२१ च्या संशोधनासाठी पात्र उमेदवारांना अधिछात्रवृत्तीचा लाभ कधी मिळणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## संपादकीय

### खाटल्यावर पहुडलेल्या काँग्रेसला चमत्काराची अपेक्षा!

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात अध्यक्ष पदाचा तिढा अद्यापही कायम आहे. असे असताना महाराष्ट्रात मात्र प्रदेश काँग्रेसने नि:श्वास टाकला दिसत आहे. गेली सहा महिने राज्यात नेतृत्व बदलाच्या चर्चा पक्षपातळीवर सुरू होत्या. प्रदेशाध्यक्ष आणि राज्य सरकारमधील महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्याकडे विकासाची दूरदृष्टी असली तरी काँग्रेसचे प्रदेशाचे नेते म्हणून पाहिजे तसा प्रभाव पाडू शकले नाही. या पृष्ठभूमीवर नाना पटोले यांच्याकडे पक्षाने दिलेली जबाबदारी ही विदर्भासाठी आशेचा किरण म्हणता येईल.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस अपेक्षित कामगिरी करू शकली नाही. राज्यात काँग्रेस जवळपास प्रभावहीन दिसली. चंद्रपुरात शिवसेनेतून आयात केलेल्या सुरेश धानोरकर या देशी दारुवाल्याने काँग्रेसची लाज राखली. अन्यथा विदर्भात या पक्षाला भोपळाही फोडता आला नसता. अलीकडच्या काळात झालेल्या कोणत्याही निवडणुकांत काँग्रेस पक्षात उत्साहाचा अभाव दिसला. नियोजन, कठोर परिश्रम आणि वैचारिक बांधिलकी या तत्त्वांशी तर जणू काही या पक्षाने फारकत घेतली की काय? असा संशय घ्यायला वाव आहे. कधी एकेकाळी आकाशातून नजर जाईल या भागावर काँग्रेसचे राज्य होते. पंजा आणि गांधी घराण्याच्या नावावर उमेदवारी प्राप्त होताच लोक आमदार, खासदार होत असत.

राज्यातही चांदा पासून ते बांदापर्यंत काँग्रेसचीच सत्ता दिसत होती. मात्र, गेल्या दोन दशकात राज्यात पक्षाला मोठी अवकळा प्राप्त झाली. राष्ट्रवादीच्या उदयानंतर या पक्षाचे खरे प्रॉब्लेम सुरू झाले. कारण थोरल्या आणि धाकट्या पवारांनी त्यांचा पक्ष जसा वाढवला, जोपासला आणि आता सांभाळताहेत तसे करायला काँग्रेसमध्ये कुणी दिसत नाही. आंदोलने, सामान्य माणसाशी संपर्क तोडून काँग्रेस नेते कडक इस्त्रीचे कपडे सांभाळण्यात मग्न राहिले. सभोवतालचा जनाधार आणि पायाखालची वाळू झपाट्याने कमी होत असताना सुद्धा काँग्रेसमधील दरबारी राजकारण कमी होताना दिसत नाही. गेली सहा वर्षे सोनिया, राहुल गांधी कोणत्याही पदांवर नाही. मात्र, आजही कुण्या प्रदेशातून दिल्लीत गेलेल्या नेत्याला तीन-चार दिवस त्यांची काही मिनिटांची भेटही मिळू शकत नाहीत, एवढे हे नेते कोषात अडकून पडले आहेत.

विचारधारा, नेत्यांचे देशासाठी बलिदान, देशाच्या विक ासात अमूल्य योगदान आणि आजही खालच्या स्तरात टिकून असलेला काही टक्के मतदार एवढे सगळे असताना त्याचा नियोजनपूर्वक वापर करून पक्षाला गेल्या दहा-बारा वर्षात राज्यात कशातही मुसंडी मारता आली नाही. एवढे हे नेते आणि पदाधिकारी निष्क्रिय आणि भुईला भार होऊन बसले आहेत. गेल्या काही वर्षात केवळ मोदींना विरोध करीत, त्यांच्यावर टीका करण्यात हयात गमावणाऱ्या राहुलसह सगळ्या काँग्रेस नेत्यांना अजूनही भाजपच्या व्यूहरचनेचा पूर्णतः: अभ्यास करता आला नाही, असेच म्हणावे लागेल. भाजप फेकत असलेल्या प्रत्येक अडथळ्यात अडकताना जहाल हिंदुत्व की मवाळ या संभ्रमात सध्या काँग्रेसचे सगळे नेते पडलेले दिसतात.

देशावर दीर्घकाळ राज्य करूनही यांना गावपातळीवर संघटना बांधता आली नाही, नव्हे जिल्हापातळीवर हक्काचे पक्ष कार्यालयसुद्धा हे नेते उभे करू शकले नाहीत. ज्या जिल्ह्यात पक्षाची जुनी भवने उभी आहेत, त्यांची गेल्या ५० वर्षात साधी रंगरंगोटीही ज्यांनी साधली नाही ते आगामी काळात पक्षात नवा उत्साह निर्माण करतील, अशी अपेक्षा करणे म्हणजे मूर्खांच्या नंदनवनात राहण्यासारखेच आहे. काँग्रेसकडे राष्ट्रीय स्तरावर स्वत:चा काही कार्यक्रम आहे की नाही, असा संशय येतो. कधी शाहीनबाग, तर कधी किसान आंदोलनाच्या बळावर पक्षाला उभारी मिळण्याची स्वप्ने हे नेते बघत असतात तेव्हा त्यांची कीव करावीशी वाटते. नरेंद्र मोदींच्या चुकांतून एखादे आंदोलन उभे राहील आणि त्यावर आपण पोळ्या भाजून सत्तेत येऊ या भरवशावर या पक्षाचे झाडून सगळे नेते असतील तर आपल्या देशात पुढची शंभर वर्षे काँग्रेस पक्षाचे काही होणे नाही, हे धुतल्या तांदळाप्रमाणे स्वच्छ आहे.

एकीकडे नाना पटोले सारख्या आक्रमक नेत्याच्या हाती राज्याची धुरा देण्याचे ठरविले जात आहे. मात्र, त्याचवेळी त्यांचे पाय खेचण्याचे नियोजनही केले जात आहे. याकामी सहा कार्याध्यक्षांची फळी नेमली गेली आहे. गट-तट-विभाग सांभाळण्यात निवडणुका येतील कधी नि जातील कधी, हे राज्य काँग्रेसला समजणार सुद्धा नाही. जेव्हा समजेल तोवर पुलाखालून भरपूर पाणी वाहून गेलेले असेल. यात्रा, पदयात्रा, मोर्चे, निदर्शने, आंदोलने, संवाद अशा उपक्रमांचा पायाला भिंगरी लावून सपाटा लावावा लागेल, तरच काँग्रेस पक्षसंघटनेत हलचल निर्माण होईल. नेत्यांच्या पोरांना, नातलगांना दूर सारून पक्षासाठी तळहातावर जीव घेऊन मैदानात उतरणाऱ्या सामान्य लोकांना सोबत घेऊन नव्याने मशागतीला सुरवात केली, तरच काँग्रेसला काहीतरी हाती लागेल. अन्यथा मैदान आधीच कुणी मारलेले आहे, हे नानांना लक्षात ठेवावे लागेल.

## द्रष्टे कर्मयोगी मनोहरभाई पटेल



परिसराच्या चौफेर विकासाचा ध्यास घेतलेले मनोहरभाई पटेल यांनी शुन्यातून विश्व निर्माण केले. शिक्षण, समाजकारण, राजकारण, उद्योग अशा विविध क्षेत्रात आपल्या कतृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या मनोहरभाईंचे कार्य निश्चीतच प्रेरणादायी असे आहे. या सेवेमुळेच त्यांची आजही चर्चा आहे. सर्व साधारण कुटुंबात ९ फेब्रुवारी १९०६ ला गुजरात राज्यातील खेडा जिल्ह्याच्या नाडीयाद या गावात जन्मलेल्या मनोहरभाई पटेल यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे अनेकांशी ऋणानुबंध निर्माण झाले. गोंदिया शहरामध्ये आल्यानंतर त्यांनी मेहनत आणि चिकाटीने काम करून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. अशा या थोर व्यक्तीमत्वाची आज ११५ वी जयंती साजरी होत आहे.

तत्कालीन भंडारा जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे अतुलनीय असेच आहेत. सिंचनाचा प्रश्न असो वा शिक्षणाचा उद्दात्त हेतू समोर ठेवून त्यांनी काम केले. त्यामुळेच देवरी तालुक्यात तत्कालीन मध्यप्रदेश सरकार व महाराष्ट्र सरकारच्या माध्यमाने मनोहरसागर जलाशय तयार झाला. या जलाशयाच्या पाण्यामुळे परिसरातील हजारो एकर जमीन सिंचनाखाली आल्याने येथील शेतकरी समृद्ध बनला आहे. तर उदार दुरदृष्टीकोन समोर ठेवून त्यांनी जिल्ह्यातील नागरिकांसाठी शिक्षणाची दारे उघडी करून दिली. बुद्धीमत्ता आणि कार्यप्रणालीने त्यांची ख्याती पश्चिमेत मुंबई तर उत्तरेत दिल्लीपर्यंत पोहोचली.

समाजसेवेसाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या मनोहरभाईंनी सर्वच वर्गाना समाज दर्जा दिला. त्यांचा शब्द म्हणजे प्रमाण असायचा. कोणतेही काम एकदा हाती घेतले की, ते पूर्ण होईपर्यंत थांबायचे नाही ही त्यांची जिद्द, या वृत्तीची आज राजकारण, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात त्यांच्या विचारांना सर्वोच्च प्राथमिकता मिळत आहे. अत्यंत साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि कार्यामुळे ते सर्वसामान्य हृदयात रूजले आहेत. आर्थिक परिस्थिती बेताचीच असतांना सर्वसाधारण बिडी उद्योगापासून सुरूवात करीत त्यांनी मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उद्योगात वेगळे स्थान निमर्ण केले. आपण शिक्षण घेऊ शकलो नाहीत याची जाणीव असतांनाही त्यांनी इतरांना शिक्षीत करण्याचा ध्यास घेतला. संकल्पनशक्ती जीवनात काही नविन करून दाखविण्याची जिद्द आणि दुसऱ्याची सेवा करण्याची इच्छा यातून त्यांनी ध्येय साध्य करून दाखविले. सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात त्यांनी प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये उडघली. गोंदिया शिक्षण संस्थेची निर्मिती करून २२ शाळा जिल्हा परिषदेला दान केल्या. त्यामुळे ते स्वनामधन्य नेते नव्हे तर शिक्षणमहर्षी ठरले आहेत. गोंदिया शहरात अभियांत्रीकी महाविद्यालय, सैनिकी शाळा आणि वैद्यकिय अभ्यासक्रमाचे शिक्षण सुरू झाले आहे.

त्यांचे पुत्र या नात्याने प्रफुल्लभाई पटेल हे त्यांच्याच पावलांवर चालून नविन किर्तिमान प्रास्थापित करीत आहेत. प्रफुल्लभाई यानी केंद्रात नागरी उड्डयणमंत्री व केंद्रीय अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम मंत्री पद सांभाळून आपल्या वडीलांच्या कार्याला हातभार लावत उद्योग व सिंचनाकडे विशेष लक्ष दिले आहे.त्यांच्याच पुढाकाराने केंद्रीय विद्यालय सुध्दा गोंदिया जिल्ह्यात सुरु झाल्यास नवी शिक्षणात क्रांती होईल व या स्वनामधन्य नेतृत्वाच्या गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील शैक्षणिक क्रांतीत नवे एक पाऊल टाकले जाईल अशी अपेक्षा ठेवली जात आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# सचिवांच्या वाढदिवसाने सुरु झाली गडचिरोलीत चिमणपाखरांची शाळा!



**गडचिरोली:** गडचिरोली जिल्हयासारख्या भागात जाऊन आदिवासी विद्यार्थ्यांसोबत जन्मदिवस साजरा करण्याची आंतरिक इच्छा आज पूर्ण झाली आहे. धानोरा येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात आज झालेला जन्मदिनाचा कार्यक्रम माझ्यासाठी अविस्मरणीय असून कोरोनानंतरच्या शाळेच्या सत्राला आजच्या कार्यक्रमाने सुरुवात होत आहे याचा आनंद आहे. दुर्गम भागात ऊन, वारा, पाऊस तसेच कोरोना न बघता विद्यादान येथील शिक्षकांनी सुरू ठेवल्याचे मला मनस्वी समाधान असल्याचे गौरवोद्गार राज्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा सचिव यांनी केले.

माहिती व जनसंपर्क विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांच्या आढाव्यासाठी विदर्भ दौऱ्यावर आलेल्या महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी गडचिरोली येथे नागपूर विभागातील जिल्हा माहिती अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीला नागपूर-अमरावती विभागाचे संचालक हेमराज बागूल यांच्यासह जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, प्रवीण टाके, मनीषा सावळे, सचिन अडसूळ, अनिल गडेकर उपस्थित होते. आज त्यांचा जन्मदिवस होता. त्यानिमित्ताने त्यांनी दुपारच्या सत्रात धानोरा येथील आदिवासी मुलींच्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयास भेट दिली. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. पांढरपट्टे यांनी यापूर्वी जिल्हाधिकारी म्हणून धुळे आणि सिंधुदुर्ग येथे कार्य केले आहे. सव्यसाची लेखक, जाणिवेचे सनदी अधिकारी यासोबतच एक प्रथितयश गझलकार म्हणून ते ख्यातीप्राप्त आहेत. यंदाचा आपला जन्मदिन त्यांनी गडचिरोली जिल्ह्यातीलआदिवासी पाड्यांमध्ये साजरा करण्याचे ठरविले होते. त्यानुसार हा उपक्रम पार पडला.

शासनाने २००८ पासून दहा ते चौदा वयोगटातील शाळेत न गेलेल्या व मधून शाळा सोडलेल्या मुलींकरिता त्यांचे किमान इयत्ता आठवी पर्यतचे शिक्षण पूर्ण करण्याकरिता कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालयाची सुरुवात केली आहे. ही शाळा निवासी असून या ठिकाणी, महिला साक्षरता कमी असणाऱ्या परिसरात, आदिवासी समुदायातील शाळाबाह्य विद्यार्थिनींना शिक्षण देण्यात येते. महाराष्ट्रात अशा ४६ शाळा असून गडचिरोली जिल्ह्यामध्ये पाच ठिकाणी या शाळा सुरू आहेत. यातील शंभर टक्के निकाल देणाऱ्या व अनेक निराश्रितांच्या आयुष्याचा कायापालट करणाऱ्या धानोरा येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात वाढदिवसाचा हा एक अनोखा भावनिक सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी शाळेतील मुलींनी पारंपारिक रेला नृत्य करीत त्यांचे स्वागत केले. डॉ. पांढरपट्टे यांनी सर्व मुलींना यावेळी शैक्षणिक साहित्य भेट दिले.

मुलींशी संवाद साधताना ते म्हणाले, गडचिरोलीसारख्या भागात शिक्षण घेताय म्हणून न्यूनगंड बाळगू नये. तुम्ही यापूर्वीच आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. तुम्ही गुणवान आहात. त्यामुळेच ही शाळा कायम १०० टक्के निकाल देत आहे. अनेकांनी यशस्वीपणे उद्योग व व्यवसायात नाम कमावले आहे. वनांनी आच्छादित अशा निसर्गरम्य परिसरात राहूनही आदिवासी बांधव जगाच्या पुढे आहेत. येथील शैक्षणिक वातावरण व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेने ते सिद्ध झाले आहे. यापुढेही खूप शिका आणि मोठं व्हा, असे आवाहनही त्यांनी यावेळी विद्यार्थिनींना केले.



नागपूर व अमरावती विभागाचे संचालक हेमराज बागूल, शिक्षणाधिकारी राजकुमार निकम, लेखा मेंढयाच्या सरपंच नंदा दुगा यांनी महासंचालक डॉ. पांढरपट्टे यांनी अति दुर्गम आदिवासी भागात भेट देवून वाढदिवस साजरा करण्याच्या संकल्पनेचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका दिपाली कुळमेथे यांनी केले. त्यांनी शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचलन शिक्षिका कीती फुंडे यांनी केले तर आभार शिक्षिका श्रीमती कुथे यांनी मानले.

तत्पूर्वी त्यांनी "आमच्या गावात आम्हीच सरकार' या संकल्पनेवर आधारित असलेल्या लेखा मेंढा या गावाला भेट देऊन ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी लेखा मेंढाच्या सरपंच नंदा दुगा यांनी गावाविषयीच्या कामकाजाची व ग्रामसभेबद्दलची माहिती दिली. लेंखा मेंढा गावात झालेल्या कार्यक्रमाला सरपंचांसह ग्रामसभेचे अध्यक्ष अलीराम हिचामी, ग्राम सभा सचिव चरणदास तोफा, नरेश कुमोटी, मनिराम दुगा, आकांक्षित जिल्हा फेलो सुधाकार गवंडगावे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# गोंदियासाठी १६५ कोटींचा निधी मंजूर



**गोंदिया :** कोविड महामारीमुळे राज्य शासनाच्या तिजोरीवर आर्थिक भार पडला असून, तब्बल ७५ हजार कोटी रुपयांची ही तूट आहे. जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यात गोंदिया जिल्ह्याने १६५ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीतील निधी मंजूर करण्यात आला. मात्र मुंबईत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करुन त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आज गोंदिया? जिल्ह्याची राज्यस्तरीय जिल्हा वार्षिक नियोजन आराखडा बैठक अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते.

आमदार सर्वश्री डॉ.परिणय फुके, अभिजीत वंजारी, विनोद अग्रवाल, वित्त व नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव देबाशिष चक्रवती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती कावेरी नाखले, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी संदीप भिमटे, श्रीमती शलाका सूर्यवंशी, श्रीमती पूजा पाटील यावेळी उपस्थित होते.

गडचिरोलीनंतर गोंदिया हा दुसऱ्या क्रमांकावरील नक्षलग्रस्त जिल्हा असल्यामुळे या जिल्ह्याला अतिरिक्त निधी मिळण्यासह तसेच यंदाच्या वर्षातील विकासनिधी खर्चासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी आमदार परिणय फुके यांनी करीत १८० कोटीची तरतूदीची मागणी केली असता, त्याबाबत मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्याशी चर्चा करु आणि त्यातून सकारात्मक तोडगा काढण्याबाबत निर्णय घेऊ, असे अर्थमंत्र्यांनी सांगितले. मुळातच यंदा कोरोना महामारीमुळे राज्याच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. असे असले तरीही आरोग्य यंत्रणेला प्राधान्य देण्यात येणार असून, राज्यातील इतर विभागातील जिल्ह्यांच्या निधीमध्ये कपात करण्यात आली आहे. ही कपात विदर्भातील जिल्ह्यांचा विकासनिधी वाढवून देण्यात येणार असला तरीही जिल्हाधिकाऱ्यांनी आरोग्य विभागाच्या बळकटीकरणास प्राधान्य देण्यास सांगितले.

राज्य शासनाने जिल्ह्याला यंदाच्या आर्थिक वर्षात १६० कोटी ४५ लाख रुपयांचा निधी वितरीत केला होता. उर्वरित विकासनिधी खर्च करण्यासाठी मुदतवाढीची मागणी जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे. पोलिस विभागाला नक्षलवाद्यांशी लढताना भूसुरुंगस्फोट विरोधी वाहनांच्या खरेदीसाठी तीन कोटी ६० लाख रुपयांचा निधी मिळाला होता. त्यामुळे यावर्षीही निधीमध्ये वाढ करण्याची जिल्हा प्रशासनाकडून विनंती करण्यात आली.

ग्रामीण भागात पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करणे, शालेय शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ, आरोग्य यंत्रणेचे बळकटीकरण, सिंचनक्षमता वाढविणे, पर्यटनाला वाव देणे, पर्यटनस्थळी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांसाठी तीन टक्के निधी राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्याच्या यंदाच्या वार्षिक सर्वसाधारण योजनेसाठी (सन २०२०-२१) १६० कोटी ४५ लाख रुपयांची तरतूद मंजूर होती. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षासाठी (२०२१-२२) जिल्हा वार्षिक? योजनेच्या आराखड्यात १० टक्के वाढीव निधी देण्याची मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी केली. राज्यस्तरावरील पशुवैद्यकीय रुग्णालये, चिकित्सालयांचे बांधकाम, ग्रामीण विकास आणि शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी जिल्ह्याने केलेली अतिरिक्त मागणीनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे श्री. पवार यांनी सांगितले.

## २०२०-२१ या वर्षात जिल्ह्याची प्रगती शुन्य



**गोंदिया:** अर्थसंकल्पीत नियतव्ययाच्या केवळ ७ टक्के खर्च करून जिल्ह्यातील विकासाला खीळ घालण्याचे काम या सरकारने केले. यातून राज्य सरकार व जिल्ह्याचे पालकमंर्त्यांच्या निष्क्रीयतामुळे जिल्ह्याची विकासकामात पिछेहाट झाल्याचा आरोप माजी सामाजिक न्याय व विशेष सहायकमंत्री तथा माजी पालकमंत्री राजकुमार बडोले यांनी केला.

माजीमंत्री बडोले यांनी म्हटले आहै की, २०२०-२१ या वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेचा अर्थसंकल्प १६०.४५ कोटी इतका होता. माहे डिसेंबर २०२० पर्यत जिल्ह्यातील कृषी क्षेत्र, ग्रामीण विकास, सामाजिक सेवा, पाटबंधारे, ऊर्जा विकास, आदिवासी विकास, नाविन्यपूर्ण योजना इत्यादी योजनांवर फक्त ११.३६ कोटी रुपये खर्च करण्यात आला. त्यामळे अर्थसंकल्पीत नियतव्ययाच्या ७ टक्के खर्च करून जिल्ह्यातील विकासाला खीळ घालण्याचे काम या सरकारने केले. त्याच बरोबर २०२०-२१ या वर्षातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे कामे सुरू करण्यात आली नाहीत. संजय गांधी व श्रावणबाळ योजनांचे सहा महिन्यापासुन अनुदान गरीब लोकांना मिळाले नाही. २०२०-२१ वर्ष संपायला फक्त दोन महिने कालावधी शिल्लक असताना सामाजिक न्याय, आदिवासी विभाग, कृषी विभाग अशा वेगवेगळ्या विभागातील योजनांच्या कामांना राज्य सरकारकडून तांत्रिक मंजुरी मिळाली नाही. एकुणच जिल्ह्याची प्रगती पुर्णपणे थांबली असून सरकारने निष्क्रियतेचा कळस गाठला आहे, असा आरोप बडोले यांनी केला आहे.

## गोंदिया मंडळात महावितरणचे ११४.२४ कोटी थकीत

**गोंदिया:** मागील वषी मार्च महिन्यात कोरोणाच्या संक्रमणामुळे करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे व्यवसाय, उद्योग, रोजगार बंद झाले. आर्थिक संकटात सापडलेल्या वीज ग्राहकांनी विजेचे बिल भरले नाही. गोंदिया-भंडारा परिमंडळात वीज ग्राहकांवर सुमारे ११४ कोटी २४ लाख रुपयांची थकबाकी आहे. महावितरणने ३ लाख ५० हजार ३५६ वीज ग्राहकांना वीज बिल वसुली संदर्भात नोटीस जारी केले आहे. या नियोजित कालावधीत वीज बिल भरण्याची सूचना करण्यात आले आहे.

कोरोनाविषाणूच्या संक्रमणामुळे मागील वषी मार्च महिन्याच्या २२ तारखेला संपूर्ण देशात टाळेबंदी करण्यात आली. उद्योग-व्यवसाय, रोजगार, वाहतूक पूर्णतः बंद होती. यामुळे लाखो लोक बेरोजगार झाले. त्यांना घरी राहिल्याशिवाय पर्याय नव्हता. दरम्यान महावितरणने एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांचे एकत्रित विजबिल ग्राहकांना पाठविले. दरम्यान वीज बिलात सवलत देण्याची घोषणा राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी केल्याने लाखो वीज ग्राहकांनी बिल भरले नाही. त्यांना वीज पिलास सवलतीची अपेक्षा होती. आता महावितरणकडून वीज बील भरण्यासाठी तगादा लावला जात आहे.

गोंदिया-भंडारा मंडळात सुमारे ३ लाख ५० हजार ३५६ वीज ग्राहक आहेत. ज्यामध्ये गोंदिया विभागात २ लाख १९ हजार ६४० घरगुती, १६ हजार १३ व्यवसायिक आणि ५ हजार ४१४ औद्योगिक तर भंडारा विभागात ९८ हजार ३११ घरगुती, ८०९९ व्यवसायिक आणि २८७९ औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांचा समावेश आहे. या वीज ग्राहकांवर ११४ कोटी २४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामुळे महावितरण कंपनी आर्थिक संकटात आली आहे. या संकटातून सावरण्यासाठी महावितरणने वीज ग्राहकांना वेळेत वीज बिल भरण्यासाठी नोटीस जारी केली आहे.

# अनुकंपाधारकांना नोकरीची प्रतीक्षा

**गोंदिया:** जिल्हा परिषदे अंतर्गत होणाऱ्या अनुकंपा पदभरतीसाठी उमेदवार चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. पण अद्यापही यावर कुठलाच निर्णय झालेला नाही. त्यामुळे अनुकंपाधारक उमेदवार पुन्हा अडचणीत आले असून त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

सन २०२० हे वर्ष आधी अधिकाऱ्यांच्या बदल्या व नंतर कोरोना संक्रमनाने प्रभावित झालेली अनुकंपा पदभरती प्रक्रियेला सुरुवात होईल अशी अशा अनुकंपाधारकांना असताना आता जि.प. आणि नगर पंचायतच्या निवडणूका होऊ घातल्याने ती अशाही मावळली. अनुकंपा पदभरतीच्या संदर्भात वारंवार पाठपुरावा करुनही प्रशासनाला अनुकंपाधारकाबद्दल सहानुभूती



नसल्याची स्थिती आहे.

कोरोनाच्या काळात रिक्त पदांमुळे प्रशासनाची हतबलता सर्व जिल्हावासीयांनी अनुभवली आहे. एकीकडे रिक्त पदे व दुसरीकडे अनुकंपाधारकांचे वाढते वयोमान, यामुळे बिक समस्या निर्माण झाली आहे. शासन निर्णयाला डावलून प्रक्रिया होत असल्याने नेहमीच अनुकंपाधरकाच्या पदरी निराशा येत आहे.

मागील ७ वर्षांपासून अनुकंपा पदभरती झालेली नाही. त्यातच अनुकंपाधारकाचे वयोमान वाढून ते अपात्र होत आहेत अशा विविध समस्यांनी अनुकंपाधारक हैराण आहेत. जिल्ह्यात ५०० वर अनुकंपाधारक उमेदवार नोकरीसाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद कार्यालयाच्या पायऱ्या झिजवित आहेत. णण त्यांच्या समस्येची जाणीव अद्यापही प्रशासनाला झाली नाही. परिणामी, अनुकंपाधारकांचे कुटुंबिय विविध समस्यांना तोंड देत आहे. त्यामुळे अनुकंपाधारकांच्या समस्यांची जाणीव शासन आणि प्रशासनाला केव्हा होणार असा सवाल अनुकंपाधारक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष संजय हत्तीमारे यांनी केला आहे.

जि.प. निवडणुकीच्या पहिले शासन निर्णयाप्रमाणे अनुकंपा पदभरती झाली नाही तर सर्व अनुकंपाधारक तीव्र आंदोलन करु असा खळबळजनक इशारा त्यांनी दिला आहे.

# शासन विरोधात प्रहारचे मुंडन डफरी बजाओ आंदोलन

**तिरोडा :** तालुक्यातील घरकुल लाभार्थींना त्वरित रेती उपलब्ध करून देण्यात यावी, धडक सिंचन विहीर योजनेंतर्गत लाभार्थीना त्वरित अनुदान देण्यात यावे यासह अन्य मागण्यांना घेऊन प्रशासनाला जागे करण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सोमवारी (दि.८) मुंडण व डफरी बजाओ प्रशासन जगाओ आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.

प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने घरकुल लाभार्थींना त्वरित रेती उपलब्ध करून देण्यात यावी अन्यथा या विरोधात मुंडण आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र प्रशासनाने याची दखल घेतल्याने प्रहारच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर मुंडण करून प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईचा निषेध केला. यावेळी आठ ते दहा कार्यकर्त्यांनी मुंडण केले. यानंतर विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. निवेदनातून धडक सिंचन विहीर योजनेच्या लाभार्थीना त्वरित अनुदान देण्यात यावे, विद्युत धक्क्याने जनावरे दगावलेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, तिरोडा शहरातील महात्मा फुले वॉर्डातील घरकुल लाभार्थींना जमिनीचे पट्टे त्वरित द्यावे, तिरोडा शहरातील ई-रिक्षाचालकांसाठी स्टॅण्डसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. घरकुलाचे प्रपत्र डमध्ये ग्रामपंचायत मागणीनुसार सुटलेली नावे ऑनलाइन करण्यात यावी. नगरेगांतर्गत ग्राम पंचायत स्तरावरील कामे व वैयक्तिक लाभाच्या योजनेचे अंदाजपत्रक मागणीनुसार आठ दिवसात तयार करुन देण्यात यावे तसेच कामाचे मस्टर त्वरित काढण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश होता.

# एसटीच्या इंधन बचतीत आगारात गोंदिया चौथ्या क्रमांकावर

**गोंदिया:-** केपीटीएल (इंधन बचत) मध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एसटी महामंडळाच्या राज्यातील पाच विभागासह पाच आगारांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून इंडियन ऑईल कार्पोरेशन लि.च्या वतीने चषक देऊन गौरविण्यात येते. ज्यामध्ये विभागामध्ये भंडारा विभागाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर राज्यातील प्रथम पाच आगारात गोंदिया आगाराने चौथ्या क्रमांकावर बाजी मारली आहे. येत्या ९ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील महामंडळ सभागृह, मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात संबंधीत विभाग प्रमुख व आगार व्यवस्थापकांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

कमी इंधनात जास्त फेऱ्या करून अधिकचे महसूल गोळा करता यावा या दृष्टीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या वतीने राज्यस्तरावर केपीटीएल (इंधन बचत एव्हरेज) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ज्या आगार अथवा विभागातील एसटी बस इंधनाची बचत करून अधिक प्रवाश्यांची ने-आण करतात अशा विभाग अथवा आगाराची नोंद करून त्यांना पुरस्कृत करण्यात येते. या वर्षीच्या केपीटीएल (इंधन बचत) कार्यक्रम सन २०२१ (सक्षम २०२१) मध्ये राज्यातील पाच विभागाची नोंद करण्यात आली आहे. विभागामध्ये भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, जालना या



पाच विभागाची निवड करण्यात आली आहे. भंडारा विभाग प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. तर भंडारा विभागाअंतर्गत भंडारा विभागाने ५२.३८ च्या प्रमाणात इंधनची बचत करून अधिकचे उत्पन्न घेतल्याची नोंद आहे. वर्धा ५१.०५, चंद्रपूर ५०.४९, गडचिरोली ५०.४७ व जालना ४९.८० हे विभाग अनुक्रमे द्वितीय, तृतिय, चतुर्थ व पाचव्या क्रमांकाचे मानकरी ठरले आहेत. विशेष म्हणजे सदर पुरस्कारासाठी निवड झालेल्या आगारांमध्ये भंडारा विभागातीलच आगार सर्वाधिक असून यात भंडारा विभागांतर्गत येत असलेल्या साकोली आगाराचा इंधन बचतीचा प्रमाण ५४.३२ आहे.

या आगाराने राज्यात पहिल्या क्रमांकाचा मान पटकाविला आहे. तर तिरोडा आगार ५३.३३, गोंदिया आगार ५२.७३ व पवनी आगार ५२.५५ प्रमाणासह क्रमश: तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकावर आहेत. त्याचबरोबर सीबीएस-२ वर्धमाननगर नागपूर आगाराची दुसऱ्या क्रमांकासाठी निवड करण्यात आली आहे. या आगाराचे इंधन बचत प्रमाण ५४.२६ कि.मी. आहे. येत्या ९ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील महामंडळ सभागृहात पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून यावेळी सर्व पाचही विभाग नियंत्रक किंवा ते उपलब्ध नसल्यास विभाग यंत्र अभियंता (चालन) व सर्व निवड झालेल्या पाचही आगार व्यवस्थपक यांना केपीटीएल चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तर तसे पत्रही संबंधित सर्व विभाग प्रमुख व आगार व्यवस्थापकांना देण्यात आले आहे.

इंधन संपणारी वस्तू असल्याने चालकांनी इंधनाची बचत करणे गरजेचे आहे. कार्यशाळेत काम करणाऱ्या मेकॅनिक कर्मचाऱ्यांनी इंधन गळती रोखावी. चालकांनी विशेष काळजी घेऊन इंधनाची बचत करावी. एक लिटर डिझेलमध्ये पाच किलोमीटरपर्यंत एसटी चालवलीच पाहिजे, या दृष्टीने चालकांनी नियोजन करावे. चालक, मेकॅलिक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य व प्रयत्नामुळे विभाग व गोंदिया, तिरोडा आगारांनी स्थान मिळविल्याचे गोंदियाच्या आगार व्यवस्थापक संजना पटले, सहायक कमर्मशाळा अधिक्षक झाडे यांनी म्हणाले.

# नियमबाह्य ऑक्सिजन प्लांट धोकादायक

**गोंदिया:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात ऑक्सिजन प्लांटचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. ज्या ठिकाणी प्लांट उभारणीचे काम सुरु आहे. त्याच्या अगदी दोनशे मीटरवर शाळा आणि महाविद्यालये, बाजारपेठ, पेट्रोलपंप आणि रुग्णालय देखील आहे. या प्लांटमुळे भविष्यात घटना घडल्यास मोठी जनहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वरिष्ठांनी या प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

गोंदिया येथील शासकीय महाविद्यालयाच्या आवारात जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीच्या मधोमध ऑक्सिजन प्लांट उभारण्याचे काम हाती घेण्यात




आले आहे. या परिसरात शंभर ते दोनशे मीटर अंतरावर तीन शाळा आहेत. त्यात एस.एस.गर्ल्स महाविद्यालय, नगर परिषदेची एस.एस.गर्ल्स हायस्कूल, महावीर मारवाडी शाळा, पेट्रोल पंप, नवीन प्राशसकीय इमारत आणि मुख्य बाजारपेठदेखील याच परिसरात आहे. त्याचप्रकारे दिवसाला पाचशे ते सातशे रुग्ण रुग्णालयात उपचाराकरिता येतात. ४०० विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण येथे घेत आहेत. यासह शेकडो कर्मचारी येथे काम करतात. प्लांटचे बांधकाम होत असल्याने कर्मचारी, विद्यार्थी आणि रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शासकीय नियमानुसार प्लांट सुरू करण्यापुर्वी निरीक्षण अहवाल तयार करुन तो मंजुरीसाठी पाठविणे गरजेचे आहे.

मात्र या संदर्भात कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. कोरोना संक्रमण काळात दिवसाकाठी १३० ते १५० ऑक्सिजन सिलींडरची गरज भासत होती. सद्यस्थितीत ३० ते ४० सिलींडरची गरज भासत आहे. जास्त सिलींडरची गरज होती, त्यावेळी प्लांट न उभारता आता मागणीत घट झाल्यानंतर प्लांटच बांधकाम करण्यात येत आहे. प्लांट पूर्णत्वास आल्यानंतर ४०० सिलींडर तयार होणार असून एवढा साठा करणार तरी काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

## अदानी फाऊंडेशनने दिला निधी

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तयार करण्यात येणाऱ्या ऑक्सिजन प्लांटकरिता अदानी फाऊंडेनने पीएसआर फंडातून निधी दिला आहे. सध्या ऑक्सिजन प्लांटची गरज नसताना देखील प्लांट उभारण्यात येत असून हा निधीचा दुरुपतयोग असल्याचा आरोप देखील सुरु झाला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अनेक बाबींची नितांत गरज आहे. हा निधी अत्यावश्यक गरजा पुरविण्याऐवजी ऑक्सिजन प्लांट तयार करण्यात येत असल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.**

# शेकडो कार्डधारक रेशनपासून वंचित




**देवरी:** तालुक्यातील चिचगड परिसरातील ग्रामीण भागातील शेकडो नागरिक अन्नपुरवठा अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे रेशन कार्डधारक लाभापासून वंचित आहेत.

देवरी तालुका हा गोंदिया जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागात मोडतो. या तालुक्यातील लोकांसमोर रोजगाराचा मोठा प्रशन असून शेती हाच पर्याय त्यांच्याकडे उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील हजारो लोक रोजगाराकरिता औद्योगिक शहरी भागाकडे जातात. कोरोना संकटामुळे या लोकांचे रोजगारही हिरावल्याने रोजगाराकरिता गेलेले हजारो लोक कसेतरी आपल्या गावाकडे परतले. परंतु उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांच्यासमोर सतत पडत असल्याने फक्त शासनाकडून मिळणाऱ्या मासिक रेशनवरच त्यांना आपला महिना चालविण्याची वेळ आली आहे.

## वितरक, अधिकाऱ्यांचे साटेलोटे

**रेशन दुकानात शिधापत्रिकाधारकांची एकूण संख्या, दुकानदाराचे नाव, त्याचा पत्ता, फोन नंबर, दुकान उघडण्याची आणि बंद करण्याची वेळ हे सर्व त्यावर नमूद असावे लागते. याशिवाय रेशनसंदर्भात अडचणी असल्यास तक्रार पुस्तिका, रेशनसंदर्भात हेल्पलाईटनचे फोन नंबर, लोकांना वेळीच माहिती हवी असेल किंवा तक्रार करावयाची असेल तर पुरवठा निरीक्षक, तहसीलदार आदि अधिकारी वर्गाचे फोन नंबर असणे महत्वाचे आहे. मात्र स्वस्त धान्य वितरक व पुरवठा अधिकारी यांचे साटेलोटे असल्याने दुकानदार नियम धाब्यावर बसवित आहेत.**

## महिला राकाँ सदस्याची तक्रार

**चिचगड क्षेत्रात जवळपास सर्व दुकानदारांकडे दरपत्रक नाही. खरेदी केलेल्या मालाची पावती न देणे तसेच ठरावकि वेळेत दुकान उघडे न ठेवता मर्जीने दुकान उघडणे आदि तक्रारी सर्वसामान्य शिधापत्रिकाधारक करीत आहेत. या क्षेत्रातील पुरवठा विभागाने तर कहरच केल्याचे दिसते. काहींना आरसी नंबर नाही तर काहींना आरसी नंबर असून धान्य न देण्याचा चंगच बांधला असल्याचे दिसते. शेकडो रेशन कार्ड वर्षापासून बनून ही रेशन लाभापासून वंचित आहेत. एकंदरीत बराच सावळा गोंधळ देवरी तालुक्यातील अनेक भागात असून या सर्व तक्रारींच्या माहितीचे निवेदन महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ता आरती जांगळे यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्याकडे दिले आहे.**

परंतु देवरी तालुक्यातील चिचगड, भागी या गावातील सुमारे ३० ते ३५ लोकांचे रेशन कार्ड वर्षांपासून बनून असूनही अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे त्या रेशन कार्डधारकांना रेशनपासून वंचित राहावे लागत आहे. रेशन कार्ड असून रेशन मिळत नसल्याने चिचगड, भागी, सुकळी, सुंदरी, कडीकसा, अंभोर या क्षेत्रातील अनेक ग्रामीण भागातील शेकडो लोक अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे रेशन लाभापासून वंचित आहेत.

# आमगाव तहसील कार्यालयासमोर आंदोलन



**आमगाव :** राष्ट्रीय स्तरावर केलेल्या चक्का जाम आंदोलनाला समर्थन व शेतकऱ्यांच्या विरोधात केंद्र सरकारने पारित केलेल्या तीन जुलूमी विधेयक रद्द करण्याच्या मागणीला घेऊन अखिल भारतीय शेतकरी संघटनेने शनिवारी (ता.६) तहसील कार्यालयासमोर आंदोलन केले.

दिल्लीतील आंदोलन शेतकऱ्यांनी शनिवारी देशभरातील शेतकऱ्यांना चक्का जाम आंदोलनाची हाक दिली होती. या आवाहनाला प्रतिसाद देत आमगाव येथील अखिल भारतीय शेतकरी संघटनेने ६ फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. दरम्यान, केंद्र सरकारने पारित केलेल्या शेतकऱ्यांविषयी तीन विधेयक संसदेचे विशेष सत्र बोलावून विधेयक रद्द करावे, कापीरेट सेक्टर कंपन्या बंद करण्यात याव्यात, शेतकरी, कष्टकरी, हमाल कामगारांना पेन्शन योजना लागू करावे, शेतकऱ्यांच्या हिताचे संसदेमध्ये कायदे करण्यात यावे, अशा मागण्यांचे निवेदन प्रतप्रधानांच्या नावे तहसीलदारांना दिले. या आंदोलनाला आमगाव तालुक्यातील ओबीसी सेवा संघ, भारतीय बौद्ध महासभा, अखिल भारतीय माळी महासंघ, आदिवासी हलबा-हलबी कर्मचारी संघटना, खिदमद ग्रुप, शेतकरी पंचायत समन्वय समिती, समता सैनिक दल, संत रविदास चर्मकार सामाजिक संघटना व साहित्यरत्न लोकशाहीद अण्णाभाऊ सामाजिक संघटनेने समर्थन दिला.

## जवाहर नवोदय विद्यालय वर्ग ९ च्या प्रवेश परीक्षा तारखेत बदल

वाशिम,: जवाहर नवोदय विद्यालय, वाशिम वर्ग ९ वीच्या रिक्त जागेसाठी होणारी प्रवेश परीक्षा १३ फेब्रुवारी २०२१ रोजी होणार होती. काही प्रशासकीय कारणास्तव ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही परीक्षा २४ फेब्रुवारी २०२१ रोजी होणार आहे. तरी या परीक्षेसाठी प्रवेश अर्ज भरलेले विद्यार्थ्यांनी आपले प्रवेशपत्र नवोदय विद्यालय समितीच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावे, असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य आर. एस. चंदनशिव यांनी केले आहे.

# संयुक्त किसान मोर्चा धडकला तहसील कार्यालयावर

**सालेकसा :** दिल्लीतील शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ शनिवारी संयुक्त किसान मोर्चाच्यावतीने तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

केंद्र सरकारने देशातील शेतकरी व कामगारांच्या विरोधात शेतकरी विरोधी तीन कायदे पारित केले. पंजाब, हरियाणा यांच्यासह देशातील सर्व शेतकरी संघटना केंद्र सरकारच्या विरोधात दिल्लीमध्ये ७२ दिवसापासून आंदोलन करत आहेत. देशव्यापी आंदोलन समर्थनात तालुक्यात संयुक्त किसान मोर्चा शनिवारी तहसील कार्यालयावर धडकला. किसान मोर्चात तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांनी आपले ट्रॅक्टर सारखे अनेक वाहन मोर्चामध्ये सहभागी होवून मोर्चाला संयुक्त रूपाने मोठा रूप दिला. या मोर्चाचे नेतृत्व संघर्ष ओबीसी कृती समितीचे अध्यक्ष बबलू कटरे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वासुदेव चुटे, मनसे तालुकाध्यक्ष ब्रजभूषण बैस,



किसान आघाडीचे जिल्हा महिला काँग्रेस प्रतिनिधी वंदना काळे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण नागपुरे, आदर्श पोलिस दक्षता कमिटीचे अध्यक्ष विमल कटरे, शिवसेना तालुकाध्यक्ष कुलतारसिंह भाटीया यांच्या नेतृत्वात संयुक्त किसान मोर्चा संपन्न झाला. मोर्च्यात तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांसह संभाजी ब्रिगेड ओबीसी संघर्ष कृती समिती, किसान संघटना, महिला संघटना इतर संघटनांनी सहभाग नोंदविला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी मनोज डोये, मनोज शरणागत, गुनाराम मेहर, रवी चुटे, राजू काळे, राजू काळे, संजय दोनोडे, डॉ. संजय देशमुख, विनोद अग्रवाल, भुमेश्वर मेंढे, राहुल हटवार, रेखा फुंडे, प्रिया शरणागत व शेतकरी उपस्थित होते.

## अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेची गोंदिया जिल्हा कार्यकारिणी गठित

**गोंदिया:** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे या संस्थेच्या वतीने अनेक वर्षापासून संपूर्ण भारतात विविध साहित्यिक उपक्रम राबविले जातात .या साहित्य चळवळीत समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन व साहित्य, कला आदी क्षेत्रात सक्रीय योगदान देणाऱ्या अनेक गुणीजणांना तसेच साहित्य क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेऊन साहित्य परिषदेच्या कार्यामध्ये समावून घेतल्या जाते.



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे, विदर्भ विभाग अध्यक्ष आनंदकुमार शेंडे, नागपूर विभाग अध्यक्ष सतीश सोमकुवर ,नागपूर विभाग सरचिटणीस जयेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष महेंद्र सोनेवाने यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. सविता बेदरकर, प्रा. वर्षा गंगणे , प्रा. गोकुल परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत अ.भा.म.सा.प. गोंदिया जिल्हा कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे .

अ.भा.म.सा.प. गोंदिया जिल्हा कार्यकारिणीमध्ये जिल्हाध्यक्ष महेंद्र सोनेवाने, कार्याध्यक्ष शिवाजी बडे, जिल्हा सचिव सौ.जयश्री सीरसाटे, संघटक सौ. यशोधरा सोनेवाने, उपाध्यक्ष प्रा. इंद्रकला बोपचे, सहसचिव संदिप कटरे , कोषाध्यक्ष विजय मेश्राम, संपर्क प्रमुख किशोरकुमार बन्सोड, प्रसिध्दी प्रमुख राहूल हटवार ,सदस्य सौ.किरण कावळे , सौ. वैशाली कोहपरे, महेन्द्र कोल्हाटकर, गोकुलसिंग परदेशी, प्रमुख सल्लागार प्रा.सविता बेदरकर व प्रा. वर्षा गंगणे आदी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

साहित्य परिषदेच्या कार्यामध्ये आपले मोलाचे योगदान लाभेल . आपल्या कार्यकुशलतेने अ.भा.म.सा.परिषदेचे कार्य समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचेल या पुढील यशस्वी वाटचालीस नवनियुक्त कार्यकारिणीला मिलींद रंगारी, दिनेश अंबादे, सी.पी. बिसेन, चैताली वडिचोर, चंद्रकांत कोळी, चंद्रकिशोर बहेकार, कविता चक्रवती, किरण मोरे, माणिक गेडाम, नूरजहाँ पठान, राजेश हजारे, संजय धामोरीकर, शालू कृपाले, सुनंदा ब्राम्हणकर, उमेंद्र बिसेन, वसंत गवळी आर्दीनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ११ व १२ फेब्रुवारी रोजी सरपंच, उपसरपंच पदांसाठी निवडणुका

**अर्जुनी-मोरगाव :** तालुक्यातील निवडणुका झालेल्या २८ ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, उपसरपंच पदांसाठी ११ व १२ फेब्रुवारी रोजी निवडणुका होणार आहेत. तसे आदेश व निवडणुकाचा कार्यक्रम तालुक्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार विनोद मेश्राम यांनी काढला आहे. सरपंच, उपसरपंच पदाच्या निवडणुक घेण्याकरिता निवडणूक अध्याशी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.




तालुक्यात एकूण ७० ग्रामपंचायती आहेत. तालुक्यात दोन टप्प्यांत निवडणुका घेतल्या जातात. नुकत्याच मुदत संपलेल्या २९ ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्यात आल्या. मात्र तालुक्यातील भरनोली गटग्रामपंचातने राजोलीला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा द्यावा या मागणीला घेवून निवडणुकीवर बहिष्कार टाकला. त्यामुळे तालुक्यात २८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यामध्ये देवलगाव व मांडोखाल या दोन ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या. निवडणुका पूर्वी सरपंच पदांचे आरक्षण काढण्यात आले नसल्याने सरपंच पदासाठी बाशिंग बांधलेल्यांचा हिरमोड झाला होता. १५ जानेवारी रोजी ग्रामपंचायत निवडणूक पार पडली. १८ जानेवारीला निकाल जाहीर झाला. तर २८ जानेवारी रोजी सरपंच पदांचे आरक्षण काढण्यात आले. आता ११ व १२ फेब्रुवारी रोजी २८ ग्रामपंचायतीसाठी सरपंच व उपसरपंच पदांसाठी निवडणुका होणार आहेत. यामध्ये १५ महिला व १३ पुरुष सरपंच पदावर आरुढ होणार आहेत.

कुंभीटोला येथे ११ फेब्रुवारी निवडणूक अध्यासी अधिकारी ना.त.के.एन.वाढई, तिडका येथे १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी ना.त. के.एन. वाढई, महागाव ११ फेब्रुवारी व इळदा १२ फेब्रुवारी निवडणूक अध्याशी अधिकारी ना.त. एम.यु. गेडाम, केशोरी ११ फेब्रुवारी व बोंडगाव-सुरबन १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी व्ही.आर. निमजे, बोरटोला ११ फेब्रुवारी व सावरटोला १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी बी.के. बंडगर, देवलगाव ११ फेब्रुवारी व सिलेझरी १२ फेब्रुवारी अध्याशी अधिकारी आर.टी. निखारे, बाराभाटी ११ फेब्रुवारी व बोंडगावदेवी १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी ए.एस. बरईकर, येगाव ११ फेब्रुवारी व जानवा १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी आर.एल. मांढरे, कवठा ११ फेब्रुवारी व माहुरकुडा १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी एम.के. मेश्राम, दिनकरनगर ११ फेब्रुवारी व करांडली १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी पी.बी. तिवारी, कोरंभिटोला ११ फेब्रुवारी व मांडोखाल १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी एस.आय. पवार, प्रतापगड ११ फेब्रुवारी व झासिनगर १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी पि.एस. कापगते, परसटोला ११ फेब्रुवारी व कन्हाळगाव १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी पी.एस. कुंभरे, परसोडी रयत ११ फेब्रुवारी व पवनीधाबे १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी एस.एच. हरिणखेडे, बोरी ११ फेब्रुवारी व इसापूर १२ फेब्रुवारी अध्यासी अधिकारी म्हणून एल.एच. टेंभरे यांची नेमणूक करण्यात आली आहे.

## बाजार समितीच्या मुख्य प्रशासक पदी लोकपाल गहाणे यांची नियुक्ती

**अर्जुनी मोरगाव :** अर्जुनी-मोर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आशासकीय प्रशासक मंडळात मुख्य प्रशासक म्हणून शिरेगाव बांध येथील लोकपाल दुधराम गहाणे यांची मुख्य प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. तर अशासकीय प्रशासक म्हणून बोळदे येथील बंसिधर रामकृष्ण लंजे ,मोरगाव येथील गिरीश देविदान पालीवाल तर इटखेडा येथील उद्धव सिताराम मेहंदळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग महाराष्ट्र शासन कार्यासन अधिकारी जयंत भोईर यांचे ४ फेब्रुवारी २०२१ चे पत्रानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. अर्जुनी-मोर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत २ सप्टेंबर २०२० ला संपुष्टात आली होती. चार सप्टेंबरला सहाय्यक निबंधक कार्यालयातील सहकार अधिकारी प्रशांत गाडे यांची प्रशासक म्हणून नियुक्ती झाली होती .सहकार क्षेत्रात सखोल अभ्यासक समजले जाणारे प्रशांत गाडे यांनी पाच महिने कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक म्हणून उत्तम रित्या कार्यभार सांभाळला होता. आता नुकतीच तालुक्यातील चार लोकांची अशासकीय प्रशासक म्हणून नियुक्ती झाली आहे. यामध्ये मुख्य प्रशासक म्हणून लोकपाल गहाणे (राष्ट्रवादी काँग्रेस )तर प्रशासक म्हणून बंसिधर लंजे (काँग्रेस )गिरीश पालीवाल (काँग्रेस )उद्धव मेहंदळे (राष्ट्रवादी काँग्रेस )यांची नियुक्ती करण्यात आली., चारही प्रशासकांच्या नियुक्तीमुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.

## शिक्षक समितीच्या जिल्हाध्यक्षपदी किशोर डोंगरवार यांची निवड

सडक अर्जुनी : शिक्षक समिती गोंदियाच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड सभा ७ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली. विजय कोंबे, सरचिटणीस महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या सभेत राज्य कार्यकारिणी सदस्य महेंद्र भुते, संघटक राजु निभोरकर प्रामुख्याने उपस्थित होते. नुतन जिल्हा कार्यकारिणी गठित करण्यासंदर्भात संपन्न झालेल्या सभेत नव्याने सन २०२१ ते २०२४ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली.यावेळी जिल्हा कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.शिक्षक समिती गोंदियाच्या जिल्हाध्यक्षपदी किशोर डोंगरवार यांची एकमताने निवड करण्यात आली.

# तिरोडा एसडीओ कार्यालयाला रिक्त पदांचे ग्रहण

**तिरोडा :** येथील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाला सुरुवातीपासूनच रिक्त पदांचे ग्रहण लागले आहे. मंजूर पदसंख्येपैकी रिक्त पदेच अधिक असल्याने कार्यरत कर्मचा?यांवर कामाचा ताण वाढला आहे. तसेच ऑगस्ट २०२० पासून नियमित उपविभागीय अधिकारी नसल्यामुळे नागरिकांची अनेक कामे रखडली आहेत. या प्रकाराकडे लक्ष घालून शासन-प्रशासनाने येथील रिक्त पदे भरणे अत्यावश्यक झाले आहे.




काही वर्षांपूर्वी तिरोडा येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय मंजूर होऊन सुरूही झाले. त्यासाठी एकूण १० पदे मंजूर करण्यात आली. यात उपविभागीय अधिकारी मंजूर पद १ असून सध्या हे पद रिक्त आहे. अव्वल कारकुनाची २ पदे मंजूर असून १ पद भरण्यात आले आहे तर १ पद रिक्त आहे. महसूल सहायकाचे २ पद मंजूर असून १ पद भरण्यात आले तर १ पद रिक्त आहे. वाहन चालकाचे १ पद मंजूर असून ते आताही भरण्यात आले नाही. स्टेनोचे १ पद मंजूर असून ते रिक्तच आहे. शिपायाचे २ पद मंजूर असून १ भरण्यात आले तर १ पद रिक्त आहे. तसेच नायब तहसीलदाराचे १ पद मंजूर असून ते भरण्यात आले आहे. अशाप्रकारे मंजूर १० पदांपैकी ६ पदे रिक्त असून केवळ ४ कर्मचा?यांच्या भरवश्यावर हे उपविभागाचे कार्यालय सुरूआहे.

**अनेक कामे रखडलेली**

येथे १२ ऑगस्ट २०२० पासून नियमित उपविभागीय अधिकारी नाही. त्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातून मंजूर होण्यासाठी आलेल्या मर्ग समरी, नागरिकांच्या झुडपी जंगलाच्या जमिनीची समस्या व इतर अनेक कामे रखडलेली आहेत. नागरिकांना एकाच कामासाठी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पण कर्मचा?यांवरील कामाचा ताण व प्रभारी अधिकारी उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांना आल्यापावली परत जावे लागते. अनेक महिन्यापासून नागरिकांना हा त्रास सहन करावा लागत आहे.

**५ प्रभारी अधिकारी बदलले**

तिरोड्यात १२ ऑगस्ट २०२० पर्यत गंगाधर तळपाडे हे उपविभागीय अधिकारी होते. त्यानंतर येथे नियमित अधिकारी मिळू शकले नाही. तेव्हापासून आतापर्यंत पाच ते सहा महिन्यांचा काळ लोटत असून या काळात तब्बल ५ प्रभारी अधिकारी बदलले आहेत. तत्कालीन उपविभागीय अधिकारी गंगाधर तळपाडे यांच्यानंतर १२ ऑगस्ट २०२० पासून गोंदियाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) राहुल खांदेसराड यांना तिरोड्याच्या उपविभागीय अधिकारी पदाचा प्रभार देण्यात आला. त्यांचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर १ सप्टेंबर २०२० पासून तिरोड्याचे तहसीलदार प्रशांत घोरूडे यांना प्रभार देण्यात आला.

यानंतर १४ डिसेंबर २०२० पासून गोंदियाचे उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजय राऊत यांना प्रभार सोपविण्यात आला. तर ५ जानेवारी २०२१ पासून गोरेगावचे तहसीलदार सचिन गोसावी यांना प्रभार देण्यात आला. तसेच १ फेब्रुवारी २०२१ पासून पुन्हा उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजय राऊत यांना प्रभार देण्यात आला आहे. यापैकी अनेक प्रभारी अधिकारी तिरोडा कार्यालयात आले नसल्याचेच समजते. त्यामुळे नागरिकांची कामे रखडलेली आहेत.

# सांडपाणी व घनकचऱ्याच्या व्यवस्थापनावर भर द्या-राजेश राठोड



**गोंदिया:** गावस्तरावर शौचालयांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे उघड्यावरील हागणदारी आता बंद झालेली आहे. मात्र स्वच्छतेच्या बाबतीत गावे स्वयंपूर्ण करणे गरजेचे असून ग्रामपंचायतीने लोकजागृतीतून सांडपाणी व घनकचऱ्याच्या व्यवस्थापनावर भर द्यावे, असे आवाहन जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेश राठोड यांनी केले.

येथील वसंतराव नाईक जिल्हा परिषद सभागृहात आयोजित दोन दिवसीय सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या ऑनलाईन प्रशिक्षणाच्या उद्घाटन सोहळ्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत हे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आर.एल.पुराम यावेळी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करुन दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. शासनाने स्वच्छतेवर चांगलाच भर दिला आहे. यासाठी निधी सुद्धा प्रचंड दिला जात आहे. गाव आपले असून गावाच्या विकासासाठी निधीचा वापर करा, असे मत व्यक्त करुन गाव स्वच्छ व सुंदर करण्यावर भर देण्याचे आवाहन ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आर.एल.पुराम यांनी केले. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्ह्यातील ५० ग्रामपंचायतीची सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन उपक्रमासाठी निवड करण्यात आलेली आहे. त्यादृष्टीने जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सर्व शाखा अभियंता, पाणी व स्वच्छता विभागातील सर्व सल्लागार, विस्तार अधिकारी पंचायत, विस्तार अधिकारी आरोग्य, रोजगार हमी योजनेचे सहायक कार्यक्रम अधिकारी, गटसंसाधन केंद्रातील कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दोन दिवसीय प्रशिक्षणात सांडपाणी व घनकचरा आराखडा निर्मिती, गाव निवडीसाठी तांत्रीक निकष, मैला गाळ व्यवस्थापन, सांडपाणी घनकचरा व्यवस्थानांतर्गत सामाजिक वर्तन, संवाद उपक्रमांचे महत्व आदि विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी स्वच्छता तज्ञ सूर्यकांत रहमतकर, मनुष्य बळ विकास तज्ञ तृप्ती साकुरे, माहिती शिक्षण व संवाद तज्ञ अतुल गजभिये, माहिती शिक्षण व संवाद तज्ञ राजेश उखळकर, मुल्यमापन व सनियंत्रण तज्ञ विशाल मेश्राम, मुल्यमापन व संनियंत्रण तज्ञ शोभा फटींग तथा जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील सर्व सल्लागार यांनी परिश्रम घेतले.



# ओबीसींच्या जनगणनेसाठी भंडाऱ्यात महाधरणे आंदोलन



**भंडारा:–** ओबीसींची जातीनिहाय जनगणना झालीच पाहीजे. त्याकरिता जनगणना प्रपत्रात ओबीसींचा स्वतंत्र रकाना तयार करण्यात यावा, या व अन्य मागण्यांकरीता ओबीसी समाजबांधवानी शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाधरणे आंदोलन केले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

स्वतंत्र भारतात सन १९३१ नंतर आजपर्यंत ओबीसींची जातिनिहाय जनगणना झाली नाही. त्यामुळे सातत्याने ओबीसींवर अन्याय सुरुच आहे. त्यामुळे ओबीसींची जातीनिहाय जनगणना झाली पाहीजे, संविधानाच्या ३४० व्या कलमाची अंमलबजावणी करावी, एस.सी., एस.टी. प्रमाणे ओबीसींना शासकीय सर्व योजनांचे लाभ मिळावे, ओबीसींना आरक्षणात असंवैधानिक लागलेली क्रिमीलेअरची अट रद्द करावी, ओबीसी विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती मिळावी, ओबीसींना संख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळावे, ओबीसी कर्मचारी व अधिकारी यांच्या पदोन्नतीमध्ये आरक्षण द्यावे, सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील एससी, एसटी, व्हिजे एनटी, एसबीसी, ओबीसी या प्रवर्गातील सर्व जमातीचे शासकीय नौकऱ्यांमध्ये असलेले आरक्षण व अनुशेष तातडीने भरण्यात यावा, या मागण्यांसाठी ओबीसी जनगणना परिषद जिल्हा भंडाराच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सर्व ओबीसी संघटनांद्वारे महाधरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रमुख समन्वयक सदानंद इलमे, भगीरथ धोटे, पांडुरंग फुंडे, मुरलीधर भें, डॉ. बाळकृष्ण सार्वे, के. झेड. शेंडे, ओबीसी सेवासंघाचे भैय्याजी लांबट, गोपाल सेलोकर, गोंदिया ओबीसी संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक खेमेंद्र कटरे, वामनराव वझाडे, जयंत धोटे, उमेश कोर्राम, ईश्वर निकुडे, गोपाल देशमुख, वामन ठवकर, तुळशीराम बोंदरे, अज्ञान राघोर्ते, प्रभू मने, मंगला वाडीभस्मे, मनोज बोरकर, मंजुषा बुरडे, वृंदा गायधने, पंकज पडोळे, श्रीधर उरकुडे, उमेश सिंगनजुडे, डॉ. आशिष माटे, दिलीप ढगे, संजय मते, ललिता देशमुख,वि अल्का नखाते, रोहीणी वंजारी, उमेश मोहतूरे आदी उपस्थित होते.



# जाती म्हणून लढण्यापेक्षा ओबीसी म्हणून लढा-बहुजन मंत्री विजय वडेट्टीवार



**खामगाव:** ओबीसी समाजातील प्रत्येक जात संघटनेने जातीसाठी लढण्यापेक्षा ओबीसी म्हणून संघटित होऊन लढण्याची तयारी केल्यास संविधानिक हक्कापासून कुणीही रोखू शकणार नसल्याचे विचार राज्याचे बहुजन कल्याण व मदत पुनर्वसन मंत्री विजय वड्डेटीवार यांनी व्यक्त केले.

ते बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील कोल्हटकर स्मारक सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या अधिवेशनात उदघाटक म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे होते. मंचावर माजी मंत्री डॉ संजय कुंटे, स्वागताध्यक्ष इंजि.रमेशचंद्र घोलप, आमदार राजेश एकडे,अॅड आकाश फुंडकर, राहुल बोंद्रे, दिलिपकुमार सानंदा,सचिन राजूरकर, शरद वानखेडे, सुषमा भड, शरयुताई तायवाडे, रेखाताई बारहाते, प्रकाश भागरथ, चेतन शिंदे, रोशन कुंभाळकर, निलेश कोडे,रुषभ राऊत, अनंता भारसाकळे, विजय डवंगे, शुभांगी कीनगे, संतोष डोंगरखोस, कल्पना मानकर,लक्ष्मी सावरकर, शकील पटेल, त्रिशरण सहारे उपस्थित होते.

यावेळी मंडल स्तंभाचे जनक माजी आमदार नारायनराव मुंढे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात पश्चिम विदर्भातील बुलढाणा, अकोला, जळगाव, अमरावती जिल्ह्यातील ओबीसी बंधु भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन ओबीसी जनगणनेचा हुंकार भरला. ओबीसीला लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद आणि आरक्षणाचा वाटा मिळण्यासाठी एल्गार केला. प्रस्ताविक स्वागताध्यक्ष रमेश घोलप यांनी केले.

स्वागताध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष डॉ अनिल अमलकार यांनी सर्व प्रमुख अतिथीचे पुष्पगुच्छ आणि शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. महीला अध्यक्षा राणे मॅडम, युवा अध्यक्ष मनोज भोपळे यांनी संचालन केले.

# महिलांनी सिलेंडर व पेट्रोल-डिझेल दरवाढीचा केला निषेध



**देवरी:** केंद्र सरकारने गॅस सिलेंडर व पेट्रोल–डिझेलची केलेली सततची दरवाढ कमी करण्याबाबद निवेदन देवरी तालुका महीला राष्ट्रवादी कांग्रेस पक्षातर्फे उपविभागीय अधिकारी मार्फत राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.

निवेदन देते वेळी राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे देवरी तालुका अध्यक्षा पारबता चांदेवार, शहर अध्यक्षा शर्मिला टेभुंणीकर, माजी नगराध्यक्षा सुमन बिसेन, माजी पंच सदस्या अर्चना ताराम, मंजुषा वासनिक, उषा तिवारी, शितल तिवारी, अनुकला कोडापे, कोमल खरोले, पुष्पा राहागंडाले, हेमलता साळवे, चन्दंकला राऊत ,निना कुभंरे, आरती जांगळे, नलिनी बहेकार, सीमा साखरे, ममता गीरी, सविता बडवाईक, सरीता सलामे, कवित टेकाम, पुष्पा मस्के, छाया मडावी, रिना राऊत, शिल्पा चाकाटे, जायत्रा गावड, सुदंर मेळे, निर्मला मेळे, रुपाली गोटसेलवार आदी उपस्थित होते.

# ओबीसी सेवासंघाचे मार्चमध्ये जिल्हाअधिवेशन तर गोरेगाव तालुकाध्यक्षपदी आर.आर.अगडेंची निवड

**गोरेगांव:** ओबीसी सेवासंघ गोंदिया जिल्हास्तरीय बैठक येथील मॉडेल कान्व्हेंट व ज्यु कॉलेजच्या सभागृहात ओबीसी सेवा संघाचे कार्याध्यक्ष सी.पी.बिसेन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकीत गोरेगाव तालुका ओबीसी सेवा संघाची कार्यकारीणी जाहीर करण्यात आली.तसेच येत्या मार्च महिन्यात ओबीसी सेवा संघाचे ३ जिल्हा अधिवेशन घेण्याच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.हे अधिवेशन ओबीसी संघर्ष कृती समिती व ओबीसी सेवा संघ यांच्या माध्यमाने आयोजित करण्यात येणार आहे. या अधिवेशनात अधिकारी कर्मचारी ओबीसी संघटनेलाही सोबत घेण्यात येणार आहे. बैठकीला ओबीसी सेवा संघाचे प्रदेश सचिव सावन कटरे, ओबीसी सेवा संघाचे जिल्हा संघटक डॉ. गुरुदास येडेवार, जिल्हा सचिव डॉ.प्रा. संजिव रहागंडाले, सडक अर्जुनी तालुकाध्यक्ष भुमेश्वर चव्हाण, सेवानिवृत्त शिक्षक ही.धा.येळे, केंद्रप्रमुख आर.आर.अगडे, ओबीसी संघर्ष कृती समितीच्या महिला उपाध्यक्ष छायाताई चव्हाण, ओबीसी संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक खेमेंद्र कटरे, डॉ.एल.एस.तुरकर,प्राचार्य डी.आर.कटरे, विनायक येडेवार, देवचंद बिसेन, पी.डी.चव्हाण आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत गोंदिया जिल्ह्यातील ओबीसी आंदोलनाच्या वाटचालींचा मागोवा घेण्यात आला.सोबतच ओबीसी सेवा संघ आणि ओबीसी संघर्ष कृती समितीच्यावतीने सयुंक्तपणे राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहितीसह ओबीसी जनगणनेचा व सत्तासंपत्तीत भागीदारीचा विचार गावांगावात रूजवण्याचे आव्हान पाहुण्यांनी केले.ओबीसीं शेतकऱ्यांचा फक्त वापर करून घेणाऱ्या राजकिय – धार्मिक पक्षसंघटनांपासून सावध राहून संवैधानिक अधिकार मिळवण्यासाठी सामाजिक आंदोलनात योगदान देण्यासोबतच सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

जिल्ह्यात १९९८ पासून सुरु झालेल्या संघटनेच्या कामाचा व विद्यमान संघटेनाचा आढावा घेत गावपातळीवर जाऊन प्रत्येक गावात शाखा निर्माण करण्यावर चर्चा करण्यात आली. यावेळी ओबीसी समाजाने इतरांना मोठे करण्यापेक्षा स्वतः मोठे होण्यासाठी कार्य करावे,सामाजिक दबाव गट निर्माण करून आपले शेती, शिक्षण, स्वास्थ्य, रोजगाराचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावे असे विचार व्यक्त करण्यात आले.यावेळी ओबीसी सेवासंघ, गोरेगांवची तालुका शाखा पुनर्गठित करुन शिवजयंती निमित्त १९फेब्रुवारीला पुणे येथे होत असलेल्या ओबीसी सेवासंघाच्या ११ व्या राज्य अधिवेशनाचे वर्च्युअल प्रक्षेपण बघण्यासोबतच सहभागी होण्यावर माहिती देण्यात आली.मार्च महिण्यात गोंदिया ओबीसी सेवासंघाचे ३ रे जिल्हा अधिवेशन घेण्याचे निश्चित करुन २६ जून २०२१ रोजी गोंदिया जिल्ह्यातील ओबीसी चळवळीच्या व्दिशतकीय वाटचालीनिमित्त एका कार्यक्रमाच्या आयोजनाच्या तयारी संदर्भात माहिती देण्यात आली. सभेचे संचालन भुमेश ठाकरे यांनी केले, प्रास्तविक रामेश्वर बागडे यांनी केले तर आभार हरिराम येरणे यांनी मानले.



**गोरेगाव तालुका ओबीसी सेवा संघाच्या अध्यक्षपदी आर.आर. अगडे यांची सर्वानुमते निवड**

गोरेगाव तालुका ओबीसी सेवा संघाच्या अध्यक्षपदी केंद्रप्रमुख आर.आर.अगडे यांची निवड करण्यात आली.सोबतच कार्याध्यक्षपदी रामेश्वर बागडे, उपाध्यक्ष पालिक वालके, जे.जे.पटले, महासचिव भुमेश ठाकरे, सचिव डॉ.श्याम फाये, सहसचिव धिरज बघेले, संघटक नरेंद्र चौरागडे, राजकुमार पटले, कोषाध्यक्ष पुरुषोत्तम साकुरे, प्रसिध्दीप्रमुख दिपक फाये, सुभाष बोपचे, सयोजंक हरिराम येरणे, संपर्क प्रमुख अरुण चन्ने व मार्गदर्शक म्हणून प्रा.आर.डी.कटरे, डॉ.एल.एस. तुरकर, ही.धा.येडे आर्दींचा समावेश करण्यात आला.

# रोजगार निर्मितीचा संकल्प घेऊन मांडलेला अर्थसंकल्प :खा.मेंढे

**गोंदिया :** रस्ते, रेल्वे, सूक्ष्म लघुउद्योग आणि जहाज बांधणी या क्षेत्रात पाच लाख कोटींच्या गुंतवणुकीची केलेली तरतूद मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला पोषक ठरणार आहे. बेरोजगारांच्या हाताला काम देण्याचा संकल्प करून मांडलेला अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने भारताला प्रगतीच्या दिशेने नेणारा असल्याची माहिती खा. सुनील मेंढे यांनी ६ फेब्रुवारी रोजी हॉटेल ग्रँड सीता येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माजी आ. रमेशभाऊ कुथे, भाजपा जिल्हा संपर्कप्रमुख सीए दिनेश अग्रवाल, सीए राजेश चतुर, रेखलाल टेंभरे, गजेंद्र फुंडे, जयंत शुक्ला उपस्थित होते.

पुढे बोलताना खा. मेंढे म्हणाले की आरोग्य कृषी क्षेत्राचा विचार करून समाविष्ट बाबी, बाजार समित्यांच्या सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली आर्थिक तरतूद, जलसिंचनासाठी दहा हजार कोटींची तरतूद, तरुण पिढीच्या दृष्टीने उचलण्यात आलेली अनेक पावले या अर्थसंकल्पाचे वेगळेपण आहे. वाहनांच्या स्क्रॅपिंग पॉलिसीमुळे ऑटोमोबाईल इंडस्ट्रीला चांगले दिवस येतील. प्रत्येक जिल्ह्यात इंटिग्रेटेड लॅब सुरू करण्याच्या निर्णय हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. संघटित क्षेत्राप्रमाणे असंघटित कामगारांना सुद्धा सर्व सोयी उपलब्ध करून देण्याच्या घेतला गेलेला निर्णय सर्वांना समानतेच्या धाग्यात बांधणारा आहे. पाच लाख कोटींची विविध क्षेत्रातील गुंतवणूक रोजगाराची अनेक दालने खुली करून देणारी आहे. कोरोनाच्या संकटकाळात केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असल्याचेही खासदार मेंढे यांनी सांगितले. कोरोना काळ बघता तज्ञांच्या मते सरकार मोठा कर लावणार आल्याचे सांगण्यात येत होते मात्र कुणावरही नवीन कर नाही. आरोग्य सुरक्षा व सुविधेचा विषय लक्षात घेता जिल्हा पातळीवर आरोग्य केंद्र तपासणी, सुविधा, विविध चाचणी केंद्राची निर्मिती या दूरगामी परिणाम करणाऱ्या गोष्टी आहेत.

ग्रामीण भागासाठी इन्फ्रास्ट्रक्चर फंड वाढवून ४० हजार कोटींचा केला गेला आहे. विकास वाढीसाठी संधी निर्माण करणे, मनुष्यबळ निर्मितीसाठी नवनवीन प्रयोग करणे, इन्फ्रास्ट्रक्चर कृषी आणि रेल्वे या तीन मुलभूत क्षेत्रात मोठ्या गुंतवणुकीमुळे रोजगार निर्मिती होईल. ज्या दिवशी बजेट सादर करण्यात आले त्या दिवशी शेअर बाजाराची उसळी याचे द्योतक आहे. नागपूर व नाशिक मेट्रोसाठी भरीव तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्राकडे केंद्र शासनाने विशेष लक्ष दिले आहे.



यासोबतच खासदार मेंढे यांनी भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्रातील प्रतिनिधी म्हणून मागील दोन वर्षांच्या काळात विकासाच्या दृष्टीने केलेले कामाची माहिती दिली. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, व्यवसायिक यांच्या अडचणी सोडविण्याच्या सोबतच जिल्ह्याचे नाव जागतिक स्तरावर कसे मोठे होईल याचाही प्रयत्न या दोन वर्षात झालेला आहे. दोन्ही जिल्ह्यातील महत्त्वाची रेंगाळलेली कामे या दोन वर्षात मार्गी लावण्याच्या प्रयत्न केला गेला असून त्यातील अनेक कामे निकाली निघाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

बिरसी विमानतळ येथून प्रवास आणि मालवाहतुकीसाठी सातत्याने सुरू असलेला पाठपुरावा, गोंदिया रेल्वे स्थानकावरील समस्या सोडविण्याचे प्रयत्न, रस्त्यांसाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेला निधी, पर्यटन विकासाच्या दृष्टीने जिल्ह्यात बनविण्यात आलेला पर्यटन आराखडा हे महत्वाचे पाऊल आहेत. तांदूळ ही भंडारा व गोंदिया जिल्ह्याची ओळख असून चिंनोर धानाचे जीआर मानांकनासाठी प्रस्ताव टाकण्यात आले आहे. ही प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असून येत्या १६ फेब्रुवारी रोजी मुंबईत या दृष्टीने महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. हा बहुमान मिळाल्यास जागतिक स्तरावर चींनोर ही आपल्या जिल्ह्याची ओळख होणार असल्याचे त्यांनी सांगितले. रखडलेले सिंचन प्रकल्प यांना आपले प्राधान्य असल्याचे सांगत बावनथळी, धापेवाडा यासारख्या प्रकल्पाची कामे पूर्ण होण्यासाठी वेळोवेळी अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या बैठक व अडचणी मार्गी लावण्यात आले आहे. गोसीखुर्द प्रकल्पाच्या थांबलेल्या निविदा प्रक्रियेला गती यावी म्हणून केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या माध्यमातून अनेकदा बैठकांचे आयोजन करून तो विषय मार्गी लावण्यात आला असल्याचे ही त्यांनी सांगितले.

# धान तस्करीप्रकरणी गुन्हा दाखल

**लाखनी–** तालुक्यात परराज्यातून विक्रीसाठी व्यापाऱ्याने आणलेल्या धानाचा ट्रक २३ डिसेंबरला जेवनाळा येथील शेतक?यांनी पकडून तहसीलदार व पोलिसांच्या स्वाधीन केला होता. याप्रकरणी चौकशी अहवालाअंती तक्रारीवरून चालक हेमराज रामपाल यादव (३२), रा. नागपूर, सुखलाल दयाराम बिसेन (५५) रा. वडसा, राजहंस शावण टेंभुर्णे (५५) रा. मांगली ता. लाखनी यांच्यावर पालांदूर गुन्हे दाखल करण्यात आले.

यातील आरोपींनी संगणमत करून एम. एच. ४० बी. एल.९८९९ क्रमांकाच्या ट्रकमध्ये एकूण ६७१ पोती धान किमती ३ लाख ६४ हजार ६३५ रू अन्नपूर्णा ट्रेडर्स बिंदकी फतेहपुर (ऊ.प्र.) येथून जेवनाळा येथे आणले होते.

# विजबिलाविरोधात तिरोडा येथे महावितरण कार्यालयाला कुलूप ठोको आंदोलन



**तिरोडा–** देशात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात जनतेला सहन करावा लागला आपल्या मोलमजुरी ते व्यवसायाला व उपासमारीची वेळ आली असून अशा परीस्थितीत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने ७५ लक्ष विज ग्राहकांना विद्युत कनेक्शन कापण्याचे नोटीस पाठवून महाराष्ट्रातील ४ कोटी जनतेला अंधारात टाकण्याच्ये पाप महाविकासआघाडी सरकारने केले आहे त्यामुळे विद्युत ग्राहकांचा होत असलेला छळ लगेच थांबविण्यात यावा व कोव्हीड काळातील विजबिल माफ करून दिलेले विज कापणीचे नोटीस परत घेण्यात यावा या निषेधार्थ भारतीय जनता पाटी तिरोडातर्फे तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या नेतृत्वात महावितरण कार्यालयासमोर टाळा ठोको आंदोलन केले असून या आंदोलनामध्ये भाजप जिल्हा महामंत्री मदन पटले, न.प.तिरोडा येथील नगराध्यक्षा सोनाली देशपांडे, कृ.ऊ.बा.स. सभापती चिंतामण रहांगडाले, उपसभापती विजय डिंकवार, मा.सभापती डॉ. वसंत भगत,भाजप तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, शहरअध्यक्ष, स्वानंद पारधी, महिला मोर्चा अध्यक्ष माधुरी रहांगडाले, न.प.सदस्य राजेश गुनेरीया मा.सदस्य डॉ.बी.एस. रहांगडाले पवन पटले, लादेन रहांगडाले, भाजप महामंत्री, तेजराम चव्हाण, दिगंबर धोके, कोषाध्यक्ष डॉ.राम प्रकाश पटले, प्रसिद्धी व संपर्क तालुका प्रमुख तिरुपती राणे, किसान आघाडी अध्यक्ष नितीन पारधी, विजय ग्यानचंदानी कृउबास संचालक पिंटू रहांगडाले, दिपक पटले,जयप्रकाश गौतम, ओबीसी आघाडी अध्यक्ष डीलेश पारधी, युवा मोर्चा शहरअध्यक्ष अमोल तितिरमारे, प्रकाश सोनकवडे, मक्रम लिल्हारे, मिनाक्षी ठाकरे, शिवलाल परिहार, सरपंच गुलाब कटरे, तुमेश्वरी बघेले, महादेव कतनकर, बसंत नागपूरे, रवी मुटकुरे व मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

